# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### मौजे तेर (जि.उस्मानाबाद) येथील गोरोबा काका मंदिर यात्री निवासाच्या कामाबाबत

**(१) ३६५४ (०७-०४-२०२०). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महत्वाच्या संत पीठांपैकी संत शिरोमणी श्री गोरोबा काका (संत गोराबा कुंभार) यांचे अत्यंत पुरातन दुर्मिळ मंदिर उस्मानाबाद जिल्हयातील मौजे तेर येथे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेर येथील भक्त निवासाचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याने आषाढी, कार्तिक महिन्यात महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातून मुकामी येणाऱ्या वारकऱ्यांची गैरसोय होत असून त्यांना अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राद्वारे यात्री निवासाच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार भक्तांची गैरसोय दूर होण्याच्यादृष्टीने सदर भक्त निवासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०५-०८-२०२२) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) मौजे तेर (जि. उस्मानाबाद) येथील गोरोबा काका मंदिर येथे भक्तनिवास बांधकामासाठी दि.१९ जून, २०१७ रोजीच्या शासननिर्णयान्वये रु.१९९.२६ लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिली असून भक्त निवासाचे स्लॅब व प्लास्टरचे काम पूर्ण झाले असून सदर कामावर आतापर्यंत रु.८८.५६ लक्ष इतका खर्च झाला आहे. तसेच, फरशी बसविणे व रंगरंगोटी करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजा भारसवाडा (ता.आष्टी,जि.वर्धा) येथील ग्रामपंचायत सदस्य यांनी पदाचा दुरूपयोग केल्याबाबत

**(२) २०२६७ (१९-०३-२०२१). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा भारसवाडा (ता.आष्टी,जि.वर्धा) येथील महिला ग्रामपंचायत सदस्यांच्या यांच्या पतीच्या नावावर ग्रामपंचायत भारसवाडा येथे गाव नमुना ८-अ नुसार जागा नसतांनाही महिला ग्रामपंचायत सदस्या तसेच ग्रामपंचायत व पंचायत समिती अधिकारी यांचेवर आपल्या पदाचा दुरुपयोग करुन अधिकाऱ्यावर दबाब टाकून गाव नमूना ८-अ पतीच्या नावे करून घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २०१९-२०२० मध्ये महिला ग्रामपंचायत सदस्यांनी त्यांच्या पतीच्या नावे पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुल योजनेचा लाभ घेवून निधी घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-११-२०२२) :** (१), (२) व (३) महिला ग्रामपंचायत सदस्य यांचे पती श्री. प्रमोद म. टाके याचे सामाजिक आर्थिक व जात सर्व्हेक्षण २०११ मधील मंजूर प्रपत्र ब यादीमध्ये अ.क्र.१२ वर नाव समाविष्ट असून श्री. प्रमोद टाके यांना सन २०१९-२० मध्ये घरकुल मंजूर करण्यात आले आहे.

नमुना नं. ८ मधील समाविष्ट कुटुंबातील कोणत्याही सदस्याची तक्रार नसल्यामुळे श्री. प्रमोद महादेव टाके यांना प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सन २०१९-२० मध्ये घरकुलाचा लाभ नियमानुसार देण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घेरा सिंहगड (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायतीचे स्वतंत्र तीन ग्रामपंचायत करण्याबाबत

**(३) ३२७४९ (०६-०१-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घेरा सिंहगड (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायतीचे स्वतंत्र तीन ग्रामपंचायत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घेरा सिंहगड ग्रामपंचायतीचे स्वतंत्र ग्रामपंचायत करण्याचा ठराव करुन प्रस्ताव ग्रामपंचायतीकडून सादर करुनही अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामपंचायत घेरा सिंहगड ही किल्ले सिंहगडाच्या अंतर्गत येत असून या ग्रामपंचायतीच्या अंतर्गत १० ते १२ वाड्यांची ग्रामपंचायत असून दुर्गम डोंगरी भागातील या वाड्यांचा भौगोलिक विस्ताराकरीता तीन स्वतंत्र ग्रामपंचायती करण्याची मागणी व तसा प्रस्ताव शासनास प्राप्त असतांनाही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन घेरा सिंहगड ग्रामपंचायतीचे स्वतंत्र तीन ग्रामपंचायत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (१६-११-२०२२) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

घेरा सिंहगड (ता. हवेली, जि. पुणे) ग्रामपंचायतीमध्ये घेरा सिंहगड (आतकरवाडी), मोरदरवाडी, सांबरेवाडी व थोपटेवाडी अशा चार महसूली गावांचा समावेश आहे. घेरा सिंहगड ग्रामपंचायतीचे विभाजन करुन घेरा सिंहगड व मोरदरीवाडी मिळून घेरा सिंहगड नं.१ व थोपटेवाडी व सांबरेवाडी मिळून घेरा सिंहगड नं.२ अश्या दोन ग्रामपंचायती स्थापन करण्याबाबत सरपंच व ग्रामसेवक यांनी विभाजन प्रस्ताव पंचायत समितीला सादर केला होता.

तथापि, ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ नुसार ग्रामपंचायत विभाजन/ एकत्रिकरण/स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासंबंधीचे निकष, अटी व शर्ती विहीत केलेल्या आहेत. सदरचा प्रस्ताव लोकसंख्येच्या निकषात बसत नसल्याने पंचायत समिती हवेली यांचेकडून ग्रामपंचायत घेरा सिंहगड यांना परत पाठविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कर वसुली करण्याबाबतचा

**(४) ३३२४१ (१२-०१-२०२२). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक वसाहतीमधील कर आकारणी ग्रामपंचायतीने करावी मात्र देयके व वसुली ग्रामपंचायती ऐवजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १३ सप्टेंबर २०२१ वा त्या सुमारास अस्तित्वात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णय अमलात येण्यापूर्वी या विषयासंबंधी औद्योगिक वसाहतीतील ग्रामपंचायतींनी मोठ्या प्रमाणात हरकतीही दाखल केल्या होत्या, हे देखील खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शासन निर्णयामुळे एमआयडिसी क्षेत्रातील जमीन, इमारती व मालमत्ता यावर ग्रामपंचायतीने लावलेले कर देयके महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून देयके बजावणे व वसुली होत नसल्याने निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी ५० टक्के वसुलीची रक्कम प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत ग्रामपंचायतीला सुपूर्द करणे होत नसल्याने राज्यातील ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या डबघाईस येऊन विकास कामे मंदावलेली आहेत, हे देखील खरे आहे काय,

(५) असल्यास, एमआयडीसी हद्दीतील कारखान्यांवर कर आकारणी व वसुली करण्याचे अधिकार पूर्ववत ग्रामपंचायतींकडे सोपविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (०९-११-२०२२) :** (१) होय.

(२) प्राप्त हरकती विचारात घेऊन त्यानंतर अंतिम निर्णय पारीत करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत हद्दीमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडधारकांना मालमत्ता कर देयके ग्रामपंचायतीकडून बजावण्यात येतात. व ग्रामपंचायतीच्या वतीने महामंडळ सदर करांची वसूली करत आहे. तसेच महामंडळाने वसुल केलेल्या कराच्या एकूण रक्कमेपैकी ५० टक्के रक्कम स्वत:कडे ठेवून उर्वरित ५० टक्के रक्कम संबंधीत ग्रामपंचायतीकडे जमा केली जाते.

(४) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे जमा झालेल्या करांपैकी ५० टक्के रक्कम संबंधित ग्रामपंचायतीस दर महिन्यास सुपूर्द करण्यात येते.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी नविन योजना राबविण्याबाबतचा प्रस्ताव

**(५) ३३३३८ (०६-०१-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील पाणी टंचाई दूर होण्याच्यादृष्टीने नदी पुनजिर्वित करण्यासाठी नविन योजना राबविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(२) असल्यास, उक्त विचाराधीन प्रस्तावावर कधीपर्यत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०९-२०२२) :** (१) सद्यस्थितीत नाही.

तथापि शासन पत्र दिनांक १० ऑगस्ट, २०१७ अन्वये नदी पुर्नजीवन कार्यक्रम अंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी नदीवरील रुपये २५०.०० लक्षच्या ११ सिमेंट नाला बंधारे, अर्जुना नदीवरील रुपये २५०.०० लक्षच्या २५ सिमेंट

नाला बंधारे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जानवली नदीवरील रुपये २५०.०० लक्षच्या ८ सिमेंट नाला बंधारे व रायगड जिल्ह्यातील गांधारी नदीवरील रुपये २५०.०० लक्षच्या ११ सिमेंट नाला बंधारे कामाना मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी जगबुडी नदीवरील २ कामे व अर्जुना नदीवरील ४ कामे प्रगतीपथावर आहेत.

दिनांक ०१ फेब्रुवारी,२०२१ रोजी झालेल्या बैठकीत नदी पुर्नजीवन कार्यक्रम स्थगित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## नांदेड जिल्ह्यातील तिर्थक्षेत्रांचा निधीअभावी विकास प्रलंबित असल्याबाबत

**(६) ३३६४० (१२-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात “क” वर्ग दर्जा असलेल्या तीर्थक्षेत्र स्थळांची संख्या १५४ असूनही मिळणारा निधी अल्पप्रमाणात असल्याने या तीर्थक्षेत्रांचा विकास होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी प्रशासनाकडून प्रतिवर्षी पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत असून ती कमी असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांना भाविक/यात्रेकरूसाठी सांडपाणी व्यवस्था , वीज, पाणी, दळण-वळण, निवास या मूलभूत सोयी सुविधा पुरवणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तीर्थक्षेत्राचा विकास होण्याच्यादृष्टीने निधीत वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२९-११-२०२२) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) मंजूर तिर्थक्षेत्रे, निधी उपलब्धता व योजनेच्या अटी व निकष विचारात घेऊन तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी विकासाची कामे मंजूर करण्यात येतात. “क” वर्ग दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्रांना निधी उपलब्धतेनुसार निधी देण्यात येतो. तथापि, शासनाने दि.२३/०२/२०२२ रोजीच्या शासननिर्णयान्वये “यात्रास्थळांच्या विकासासाठी जिल्हा परिषदांना अनुदान,” या जिल्हा वार्षिक योजनेत रु.३०.०० लक्ष रक्कमेच्या मर्यादेत वाढ करून ती रु.६०.०० लक्ष इतकी केली आहे. “क” वर्ग दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्रांना “ब” वर्ग दर्जा देण्यासाठी शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यास व योजनेच्या अटी व निकषांची पूर्तता झाल्यास निधी उपलब्ध करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेल्या शिक्षकांना एकस्तर वेतनवाढ मिळणेबाबत

**(७) ३३७९४ (१२-०१-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हयास्तरावरील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना सन २०१७ पासून एकस्तर वेतनवाढ मिळाली नाही, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन शासननिर्णय निर्गमित करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-११-२०२२) :** (१), (२) व (३) राज्यातील जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील कार्यरत शिक्षकांपैकी शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेल्या शिक्षकांना जिल्हा शिक्षक पुरस्कार सर्वसाधारणपणे दिनांक ५ सप्टेंबर या शिक्षकदिनी प्रदान करण्यात येतो. अशा पुरस्कार प्राप्त शिक्षकांना एक आगावू वेतनवाढ देण्याबाबतची तरतूद ग्रामविकास विभागाच्या दि.१२.१२.२००० च्या परिपत्रकात होती.

तद्नंतर, जिल्हा पुरस्कार योजने अंतर्गत जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षकांना एक वेतनवाढ मंजूर करण्याबाबतच्या उक्त निर्णयाचा फेरविचार करण्यात आला असून अशा पुरस्कार प्राप्त शिक्षकांना एक आगावू वेतनवाढ मंजूर करण्याबाबतची तरतूद ग्रामविकास विभागाकडील शासन परिपत्रक दि.०४/०९/२०१८ अन्वये वगळण्याचा निर्णय घेतला आहे.

सद्यस्थितीत, अशा पुरस्कार प्राप्त शिक्षकांना एक आगावू वेतनवाढ मंजूर करण्याची कोणतीही बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळा अंतर्गत योजना क्र. ५०९ अत्यावश्यक संच पुरविणे संबंधीची निविदा तुर्तास स्थगित करणे आवश्यक असल्याबाबत

**(८) ३३७९६ (०५-०१-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळा अंतर्गत योजना क्र. ५०९ अत्यावश्यक संच पुरविणे संबंधीची निविदा तुर्तास स्थगित करणे आवश्यक असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त निविदा फक्त ५ लाख संचांसाठी असून प्रत्यक्ष नोंदीत लाभार्थी संख्येनुसार नसणे, निविदेतील सेक्शन ३ मध्ये निविदा धारकांसाठी जी प्राथमिक पात्रता ठेवली असून संचाची किंमत उत्पादन मुल्यापेक्षा जास्त असल्याने सदरहू मंडळाचे नुकसान होत आहे, या इतर अनेकविविध गोष्टी असुन की ज्यामुळे शासनाच्या उक्त मंडळाचे आर्थिक नुकसान होत आहे या बाबीची चौकशी करणे आवश्यक असल्याने शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१०-११-२०२२) :** (१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत योजना क्र. ५०९ अत्यावश्यक संच पुरविणेसंबंधीची निवीदा तुर्तास स्थगित करुन सुधारित निविदा प्रसिध्द करणेबाबत मा. श्री.बाळुभाऊ उर्फ सुरेश धानोरकर, खासदार (चंद्रपूर-वर्णी-आर्णी निर्वाचन क्षेत्र) यांनी दि.०६.०३.२०२१ व श्रीमती प्रतिभा सुरेश धानोंरकर, वि.स.स (वरोरा-भद्रावती निर्वाचन क्षेत्र) यांनी दि. ०६.०३.२०२१ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली होती.

(२) बांधकाम कामगारांच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या अनुषंगाने त्यांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच देणेबाबत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने पारित केलेल्या ठरावानुसार शासन मान्यतेने मंडळाकडील नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार लाभार्थ्यांना अत्यावश्यक वस्तू संच व सुरक्षा संच २.२५ लक्ष बांधकाम कामगारांना वाटप करण्याचे आदेश देण्यात आले होते.

मंडळाच्या दि. २२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीतील पारित ठरावानुसार सुरक्षा संचामध्ये समाविष्ठ करावयाच्या वस्तू व त्याचे स्पेसिफिकेशन याबाबत संचालक, सुरक्षा व औद्योगिक संचालनालय यांचेकडून अभिप्राय प्राप्त करण्यात आले व त्यानुसार सुरक्षा संच व अत्यावश्यक संचातील वस्तूंचे बाजारातील दर गठित समितीमार्फत प्राप्त करण्यात आले होते. त्यानुसार अत्यावश्यक संचासाठी रु.४६१३/- (वस्तू व सेवाकर वगळून) व सुरक्षा संचासाठी रु. ४८७५/-(वस्तू व सेवाकर वगळून) प्राप्त झालेले दर कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील गठित समितीसमोर सादर करण्यात आले होते. प्राप्त निविदापैकी अत्यावश्यक संचाकरिता दर रु. ४५७९/- (वस्तू व सेवाकर वगळून) व सुरक्षा संचाकरिता दर रु. ४६६१/-

(वस्तू व सेवाकर वगळून) न्यूनतम दर सादर करणाऱ्या संस्थेची निवड संच वितरणाकरिता करण्यात आली.

सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वितरणाकरिता देशपातळीवरील व राज्य पातळीवरील वर्तमानपत्रात जाहीर ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन, ई-निविदा पध्दतीने संस्था व दर निश्चितीची कार्यवाही करण्यात आली आहे. ई-निविदाद्वारे प्राप्त झालेले अत्यावश्यक संच व सुरक्षा संचाचे दर हे न्यूनतम असल्याने तसेच समितीने शिफारस केलेल्या दरापेक्षा कमी असल्याने मंडळाच्या नुकसानीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगाव (जि.नाशिक) ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन करुन वाडी व तांडे करीता नवीन ग्रामपंचायती स्थापन करण्याबाबत

**(९) ३४९६४ (०६-०१-२०२२). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव विधानसभा मतदार संघातील (जि.नाशिक) ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन करुन वाडी व तांडे करीता नवीन ग्रामपंचायती स्थापन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे ग्रामविकास मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन करुन वाडी व तांडे करीता नवीन ग्रामपंचायती स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने नियमानुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना कळविण्यात आले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी शासन निर्णय दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ नुसार लोकसंख्या निकषाची पूर्तता होत नसल्याने नांदगाव विधानसभा मतदार संघातील ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन करुन वाडी व तांडे याकरीता नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबत प्रस्ताव सादर करता येत नसल्याचे कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मोठ्या ग्रामपंचायतीनां विशेष अनुदान उपलब्ध करून देणेबाबत

**(१०) ३५०४६ (०७-०१-२०२२). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लोकसंख्येने मोठ्या असलेल्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधांसाठी नगरपंचायत व नगरपालिकांच्या धर्तीवर विशेष अनुदान उपलब्ध करुन देण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने माहे ऑगस्ट, २०२० मध्ये तसेच माहे जून २०२१ वा त्यादरम्यान शासन स्तरावर बैठक घेण्यात आली होती, बैठकीत काय निर्णय घेण्यात आला, याबाबतची सविस्तर माहिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील मोठ्या ग्रामपंचायतीना विशेष अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२२-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

श्री. दिलीपराव शंकरराव बनकर, मा. विधानसभा सदस्य यांनी दिनांक ३१.०७.२०२० रोजीच्या पत्रान्वये मा.उपमुख्यमंत्री महोदयांकडे राज्यातील मोठया ग्रामपंचायतींना नागरी सुविधांसाठी विशेष अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी केली आहे.

(२) व (३) सदर मागणीच्या अनुषंगाने मा. उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५.०८.२०२० रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये नगर विकास विभागाच्या नगरोत्थान योजनेप्रमाणे राज्यातील २५,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींसाठी ग्रामोत्थान योजनेचा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे सादर करावा, असा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणी क्रीडा संकुलांचे निर्माण करण्याबाबत

**(११) ३५२३८ (१०-०१-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्याच्या तालुक्याच्या ठिकाणी नवीन क्रीडा संकुल करण्याबाबत तसेच घाणीच्या व झाडेझुडपे असल्यामुळे त्यांना तातडीने दुरुस्त करुन विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्याकरिता खेळाडूंना अभ्यास करण्यासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी जिल्हा प्रशासन व शासनाकडे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीप्रमाणे क्रीडा विभागामार्फत तालुक्याच्या ठिकाणी क्रीडा संकुल करण्याचा व विविध स्पर्धा आयोजित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) वाशिम तालुका क्रीडा संकुलाकरीता जागेची मागणी जिल्हाधिकारी, वाशिम यांचेकडे करण्यात आली आहे. अद्याप जागा प्राप्त झालेली नाही. जागा प्राप्त होताच त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## म्हसनी (ता. मानोरा, जि.वाशिम) ते धामणगाव (देव) येथील पाणंद रस्त्यांबाबत

**(१२) ३५२५७ (०५-०१-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हसनी (ता. मानोरा, जि.वाशिम) ते धामणगाव (देव) शेतशिवार रस्ता जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नाला खोली करण्याचे काम केल्याने व नाला खोलीकरणाची माती पाणंद रस्त्यावर टाकल्याने रस्ता पूर्णत: बंद झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी शेतामध्ये येण्या-जाण्याकरीता रस्ता नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त पाणंद रस्त्याची दुरुस्ती करून शेतक-यांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-१०-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

संबंधित शेतकऱ्यांना जाण्यायेण्यासाठी दोन पर्यायी रस्ते उपलब्ध असून सदर रस्त्यांचा वापर शेतकरी करीत आहेत.

(३) पाणंद रस्ते हे जिल्हा परिषद अंतर्गत येत असल्याने सदर पाणंद रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत जिल्हा जलसंधारण अधिकारी, कार्यालय वाशिम यांनी जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग यांना कळविलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पारोळा (जि.जळगांव) येथील तालुका क्रीडा संकुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१३) ३५३१२ (०७-०१-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारोळा (जि.जळगांव) येथील क्रीडा संकुलाच्या कामावर शासनाचा कोट्यावधी रुपये खर्च होवूनही सदर काम अद्याप अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणकोणती कामे अपूर्ण असून कामे पूर्ण करण्यासाठी किती कालावधी लागणार असून झालेल्या कामांची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, सदरच्या क्रीडा संकुलाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) तालुका क्रीडा संकुल, पारोळा येथे २०० मी. धावनपथ, विविध खेळांची मैदाने, मैदान समपातळीत करणे, कुंपण व भिंतीचे बांधकाम इ. सुविधा पूर्ण झालेल्या आहेत. बहुउद्देशीय हॉल मधील उर्वरीत कामे पूर्ण करण्यात येत आहेत.
(३) शासन निर्णय दि. २३.०३.२०२२ नुसार तालुका क्रीडा संकुलांची अनुदान मर्यादा सुधारीत करण्यात आली आहे. त्यानुसार तालुका क्रीडा संकुल, पारोळा (जि. जळगाव) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास तालुका क्रीडा संकुल समितीची मान्यता घेऊन राज्य क्रीडा विकास समितीसमोर ठेवण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## काळदरी (ता.पुरंदर, जि.पुणे ) येथील पाझर तलावाच्या सांडव्यांना भगदाड पडल्याबाबत

**(१४) ३५३७१ (०५-०१-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काळदरी (ता.पुरंदर, जि.पुणे ) येथील महत्त्वाच्या ३ पाझर तलावांच्या सांडव्यांना अतिवृष्टीमुळे भगदाड पडले आहे, तर ४ सिमेंट बंधाऱ्यांच्या बाजूचा भराव वाहून नव्याने सांडवे तयार होऊन पाणी वाहून जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या पाझर तलावालगतचा भराव खचून तलाव फुटण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने तातडीने पहाणी करुन या तलावांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येते आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१०-२०२२) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.
काळदरी येथील जिल्हा परिषद(ल.पा.), पुणे अंतर्गत येणा-या ३ पाझर तलावांपैकी एका तलावाच्या सांडव्याच्या खालील बाजुच्या भिंतीचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे. पण त्यातील पाणी वाहून जात नाही. तसेच मृद व जलसंधारण विभागांतर्गत येणा-या २ सिमेंट बंधारे काळदरी क्रमांक १ व २ यांच्या बाजुचा भराव वाहून गेले होते. तसेच उर्वरित २ सिमेंट बंधारे कृषी विभागांतर्गत येत असून त्यांचेही काही प्रमाणात नुकसान झाले आहे.

(२) हे खरे नाही.

सदर तीनही पाझर तलावांचे भराव सुस्थितीत असून, मात्र इतर उपांगाची दुरुस्ती करणे गरजेचे आहे.

(३) जिल्हा परिषद ल.पा., पुणे यांच्या मार्फत तीन पाझर तलावांपैकी, चिकणेवाडी व खराडवाडी या पाझर तलावांच्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच काकरवस्ती तलावाच्या दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर ४ सिमेंट बंधा-यांपैकी मृद व जलसंधारण विभागाच्या अखत्यारितील दोन बंधारे काळदरी क्रमांक १ व २ यांची दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच उर्वरित दोन बंधा-यांची कामे कृषी उपविभाग, सासवड यांच्या मार्फत पूर्ण करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिसेगाव (ता.केज, जि.बीड) येथील क्रीडा अधिकारी यांची चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत**

**(१५) ३५६८९ (१०-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिसेगाव (ता.केज, जि.बीड) येथील क्रीडा संकुलासाठी शासकीय गायरान जमिनीचा चार हेक्टर जागेचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजुरीसाठी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे सादर केल्यानंतर जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी सदर क्रीडा संकुलासाठी चार हेक्टर ५६ आर जमिनीची आवश्यकता असल्याचे सांगितल्यामुळे पूर्ण प्रस्ताव व प्रस्तावातील कागदपत्रे परत तयार करावा लागल्याने सदर प्रस्तावात काय कमी आहे हे पाहण्याची जिल्हा क्रीडा अधिकारी यांची जबाबदारी असून वारंवार सांगूनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंबाजोगाई येथील क्रीडा संकुलाचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याने पाहणी करुन बैठक घेतली होती व सदर काम अंदाजपत्रकाप्रमाणे गुणवत्तेचे करुन घेण्याबाबत सूचना देऊन त्याला एक वर्ष होऊनही कोणतीही कार्यवाही केली नसून क्रीडा संकुल दुरुस्ती केली नाही तसेच अंबाजोगाई हे शहर शैक्षणिक सांस्कृतिक शहर असून येथे खेळाडू मोठ्या प्रमाणात असल्यामुळे संकुलाचा प्रस्ताव पाच कोटी रुपयांचा करण्याबाबत सांगूनही त्यांनी प्रस्ताव केला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्ह्यात क्रीडा अधिकारी म्हणून रुजू किंवा क्रीडा कार्यालय बीड जिल्ह्यात सुरु झाल्यापासून संस्थांना वाटप अनुदानाची चौकशी करुन जिल्ह्यातील खेळाडूंना कुठलेही सहकार्य वा मार्गदर्शन करत नसून चौकशी करणे तसेच बीडच्या क्रीडा विकासात दुर्लक्ष करुन त्या खेळाडूंशी भाषा अरेरावीची व उध्दट असल्याच्या तक्रारी आहेत त्यामुळे त्यांची उच्चस्तरीय चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी क्रीडा व युवक कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक ०३ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-१२-२०२२) :** (१) व (२) पिसेगाव (ता.केज, जि.बीड) येथील क्रीडा संकुलासाठी शासकीय गायरान जमिन देण्याचा प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिका-यांकडून सादर केला होता. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांच्या दि. १४.०१.२०२२ च्या आदेशान्वये तालुका क्रीडा संकुल, केज जि. बीड करिता मौजे पिसेगांव ता. केज जि. बीड येथील गट नं. १०० मधून ४ हेक्टर, ५६ आर. एवढी शासकीय जागा मंजूर करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही,

सदर संकुलातील ४०० मी. धावनमार्ग, मैदानांचे सपाटीकरण, जिम हॉल, कार्यालय इमारत ही कामे झाली असून सदर कामासंदर्भात उपस्थित केलेल्या त्रृटींबाबत काम सुरू असून ते अंतिम टप्प्यात आहे.

राज्य क्रीडा विकास समितीच्या दि. २३ मार्च, २०२२ च्या बैठकीत सदर तालुका क्रीडा संकुलाच्या रु. १११०.९९

लक्षच्या सुधारीत अंदाजपत्रक व आराखड्यास अनुदान मर्यादेव्यतिरिक्त निधी स्वबळावर उभारण्याच्या अटीच्या अधीन राहून मंजुरी देण्यात आली आहे.
(४) व (५) याबाबत तत्कालीन मा. मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांना सन्माननीय लोकप्रतिनिधी यांनी दि. ०३ सप्टेंबर, २०२१ रोजी निवेदन दिले आहे. यानुषंगाने उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, औरंगाबाद यांनी चौकशी करुन दि. २८.०१.२०२२ अन्वये शासनास अहवाल सादर केला आहे. अहवालात तक्रारीत तथ्य नसल्याचे नमूद केले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील ग्रामीण भागातील दुरावस्था झालेल्या रस्त्यांच्या दुरूस्तीकरिता निधी मंजूर करणेबाबत**

**(१६) ३५७६४ (०६-०१-२०२२). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील ग्रामीण भागातील गावांगावांना जोडणारे लेखाशिर्ष (३०५४) ग्रामीण मार्ग कित्येक वर्षांपासून दुरावस्थेत आहेत, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, मागील काळात मोठया प्रमाणावर झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्त्यांची मोठया प्रमाणात दुरावस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यांकरीता जिल्हा परिषद रायगड यांचेकडे रस्ते दुरूस्तीकरीता निधीची कमतरता असल्याने परिस्थिती जैसे थे आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाकडून उक्त परिस्थतीची पाहणी करण्यात आली आहे काय व पाहणीच्या अनुषंगाने काय निदर्शनास आले तसेच निधी उपलब्ध करून ग्रामीण भागातील रस्ते दुरूस्त करून लोकांची गैरसोय दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-११-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे. तथापि, दरवर्षी रस्ते व पुल दुरुस्तीच्या योजनांमधून रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) रस्ते विकास आराखडयानुसार रायगड जिल्ह्यातील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांची एकूण लांबी ५७३७.४० कि.मी एवढी आहे. रस्ते व पुल दुरुस्तीच्या योजनांमध्ये उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांची लांबी व मानव विकास निर्देशांक विचारात घेऊन करण्यात येते. रायगड जिल्ह्यासाठी सन २०१९-२० व २०२०-२१ या अर्थिक वर्षात खालील प्रमाणे निधी उपलब्ध करुन दिलेला आहे :-

(रु.लाखात)

| **योजनेचे नांव** | **२०१९-२०** | **२०२०-२१** | |
|---|---|---|---|
| रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम | ३०५४-२४१९ | १०८६.७४ | १६०२.३८ |
| जिल्हा वार्षिक योजना | ३२५२.९४ | ३३६८.५७ | |

सन २०२१-२२ या अर्थिक वर्षात जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत जिल्हा परिषद, रायगड यांना रु.६३२१.८६ लक्ष निधी उपलब्ध झालेला आहे. तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार रस्ते दुरुस्त करण्याचे जिल्हा परिषदेचे प्रयत्न आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील गावांमध्ये सिमेंट बंधारे बांधण्याबाबत

**(१७) ३५८०३ (०५-०१-२०२२). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील (ता. पेण) मौजे-कांदळे, गागोदे, जावळी, बळवली, आंबिवली, आंबेघर, वरप, कोंडवी, पाबळ, जीर्णे, कुरनाड, जांबोशी, कार्ली या गावांमध्ये पाणी टंचाई, भाजीपाला व फळबाग क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने पाणी पातळीत वाढ होवून पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न मार्गी लावण्यासाठी एकूण १८ कृषी (सिमेंट) बंधारे बांधण्यासाठी मा.मंत्री कृषी, महाराष्ट्र राज्य व मा.जिल्हा अधिक्षक कृषी, कृषी अधिकारी, अलिबाग, रायगड यांना दिनांक ६ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून पहाणी करण्यात आली आहे काय, तदअनुषंगाने रायगड जिल्हयातील पेण तालुक्यातील गावांमध्ये शेतकऱ्यांना फळबाग,भाजीपाला क्षेत्र वाढविण्यासाठी कृषी बंधारे (सिमेंट बंधारे) बांधून मिळणे तसेच उक्त बंधाऱ्यांना निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१०-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत पेण तालुक्यातील गावांमध्ये सन २०२१-२२ मध्ये एकूण रक्कम रू.१५७.८८ लक्ष निधी खर्च करून नव्याने १३ सिमेंट नाला बांधाची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देवळाली (ता.नाशिक, जि. नाशिक) मतदारसंघातील विकास कामांना निधी मिळणेबाबत

**(१८) ३६११० (०५-०१-२०२२). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळाली (जि. नाशिक) मतदारसंघातील देवरगांव उपसा सिंचन योजना, विविध पाझर तलावांची दुरुस्ती व मौ. दुगांव येथील सिमेंट काँक्रीट बंधारा दुरुस्ती अशा एकूण १० विकास कामांना निधी उपलब्ध करण्याबाबत मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये मा.राज्यमंत्री, मृद व जलसंधारण यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी "उचित कार्यवाही करावी" असे शासनाने दिनांक २ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या पत्राद्वारे आदेशित करुन तसेच मा. प्रादेशिक, जलसंधारण अधिकारी, नाशिक यांना कळवून त्याबाबत निधी मागणीच्या अनुषंगाने कार्यवाही करुन शासनास अवगत करण्याबाबत उक्त पत्रान्वये कळविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी १० विकास कामांना त्वरीत निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०९-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तुत १० कामांपैकी ०२ उपसा जलसिंचन योजना या कामांच्या पाणी वापराबाबतची कार्यवाही सुरु आहे. जिल्हा परिषदेकडील ०२ पाझर तलावांच्या दुरुस्ती कामांपैकी ०१ कामाची दुरुस्ती पूर्ण करण्यात आली असून ०१ कामाची दुरुस्ती आराखड्यात प्रस्तावित आहे. दुगाव सिमेंट कॉक्रीट बंधा-याची दुरुस्ती सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेनंतर करण्यात येणार असून उर्वरित ०५ पाझर तलावांच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांच्या प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत सर्वांसाठी घरे या योजनेची अंमलबजावणी करणेबाबत**

**(१९) ३६१५५ (०६-०१-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान आवास योजनेंतर्गत सर्वांसाठी घरे या योजनेअंतर्गत मा. पंतप्रधान यांनी सन २०२२ पर्यंत सर्वाना घर देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, त्यानुसार गडचिरोली जिल्ह्यात आतापर्यंत १६ हजार ९०८ घरकुल बांधण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले मात्र १६ हजार ५२४ घरकुल मंजूर करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात आतापर्यंत केवळ १० हजार ५४२ घरकुलांची बांधकामे पूर्ण करण्यात आली असून मंजूरीच्या प्रमाणात बांधकाम होत नसल्याने हजारो लाभार्थी या लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,सदर योजना प्रभावितपणे राबविण्यासाठी अधिकारी व कर्मचारी या योजनेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असून या योजनेची अमंलबजावणी करीत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन मंजूर घरे त्वरीत मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्हयाकरीता आतापर्यंत सन २०१६-१७ ते २०२०-२०२१ पर्यंत एकूण प्राप्त उद्दिष्टये २२१०४ असून २१८५३ घरकुलांना आतापर्यंत मंजुरी देण्यात आलेली आहे व उर्वरीत २५१ घरकुलांना मंजुरी देण्याची कार्यवाही सुरू आहे.

एकूण २१८५३ मंजुरी देण्यात आलेल्या घरकुलांपैकी १६०८८ घरकुलांची बांधकामे पुर्ण करण्यात आली असुन ५७६५ घरकुले पुर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.भाटुंबा (ता.केज जि. बीड) येथील ग्रामपंचायतीमधील प्रलंबित असलेल्या विविध कामांबाबत**

**(२०) ३६४२० (२५-११-२०२१). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.भाटुंबा (ता.केज जि. बीड) येथील ग्रामपंचायतीतील प्रलंबित असलेल्या विविध कामाच्या स्थितीबाबतचे निवेदन सरपंच, मौ.भाटुंबा यांनी दिनांक ७ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास गटविकास अधिकारी, पंचायत समिती, केज, जि.बीड यांना दिले होते परंतु आजमितीस त्यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याची माहिती माहे जानेवारी, २०२० च्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, गटविकास अधिकारी यांच्याकडून कामाची दखल घेतली जात नसल्यामुळे गावातील विविध विकास कामे रखडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने गावातील विकास कामांकडे दुर्लक्ष करणाऱ्या गटविकास अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यातयेत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-११-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सरपंच ग्रामपंचायत भाटूंबा यांनी दि.०९.१०.२०१९ रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, केज यांना निवेदन दिले होते. त्यास अनुसरून जिल्हा स्तरावरून चौकशी पथक नेमून चौकशी करण्यात आली आहे.

सदर पथकाच्या अहवालानुसार ग्रामपंचायत भाटुंबा येथील तत्कालिन सरपंच व ग्रामसेवक यांना कारणे दाखवा नोटीस देवुन खुलासा मागविण्यात आला संबंधित सरपंच व ग्रामसेवक यांचा खुलासा असमाधानकारक असल्याने तत्कालिन सरपंच व ग्रामसेवक यांचेकडुन अपहारीत रक्कम रु.२,९०,०००/- वसुल करण्यात येऊन ग्रामसेवक यांची विभागीय चौकशी प्रस्तावित केलेली आहे.

(२) नाही , हे खरे नाही.

ग्रामपंचायत स्तरावर १४ वा वित्त आयोगाचे काम व इतर विविध विकास कामे केलेली आहेत व काही कामे चालू आहेत .

(३) व (४ ) प्रश्न उद्भवत नाही .

---

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेताचे झालेल्या नुकसानीबाबत

**(२१) ३७७१७ (११-०४-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील पोशीर नदीवरील बोर घाट येथे नव्याने बांधण्यात आलेल्या सिमेंट बंधाऱ्यात पाणी साठवून ठेवण्यासाठी लावलेली लोखंडी प्लेट तुटल्यामुळे पाणी वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठयाप्रमाणात नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोरगाव येथील जवळपास ३० शेतकरी ५० एकर शेत जमिनीवर भाजीपाल्याची शेती करीत असून जलसंधारण विभागाने ७३ लाख रूपये खर्च करून बांधलेल्या बंधाऱ्यामुळे शेतकऱ्यांना भाजीपाल्याची शेती करून उत्पन्न मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत विभागाच्या दुर्लक्षामुळे बंधाऱ्याचे काम नित्कृष्ट दर्जाचे झाल्यामुळे लोखंडी प्लेट तुटुन पाणी वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठयाप्रमाणात भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त विभागातील बंधाऱ्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०९-२०२२) :** (१) हे खरे नाही.

बोरगाव सिमेंट कॉक्रीट बंधा-याचे लोखंडी प्लेट तोडल्यामुळे पाणी वाहून गेले आहे. मात्र कोणत्याही शेतक-याचे नुकसान झालेले नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

बंधा-याचे काम तांत्रिकदृष्ट्या व गुणात्मक पध्दतीने पूर्ण करून बंधारा दिनांक ०३/०६/२०२१ रोजी देखभाल दुरुस्तीसाठी ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करण्यात आला आहे.

ग्रामपंचायतीच्या अहवालानुसार केवळ दोन ते तीन शेतकरी साधारणत: दोन एकर क्षेत्रात भाजीपाला करतात.

(४) दिनांक १३/०१/२०२२ रोजी रात्री अज्ञात व्यक्तीकडून बंधा-याच्या गेटला पारई (पार) घालून गेट प्लेट तोडल्यामुळे पाणी वाहून गेले. याबाबत ग्रामपंचायत ओलमन (बोरगाव) यांनी दिनांक १५/०२/२०२२ रोजी नेरळ पोलिस स्टेशन येथे रितसर फिर्याद दिली असून पोलिसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीकडून बंधा-याची प्लेट दुरुस्त करुन बसविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**न्याहाळे खुर्द (ता.जव्हार, जि.पालघर) ग्रामपंचायतमध्ये लाखो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२२) ३७७७७ (१२-०४-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील न्याहाळे खुर्द ग्रामपंचायतीत दलित वस्ती योजनेतून मंजूर असलेली विकासकामे न करता लाखो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी जिल्हा परिषदेकडे ग्रामस्थांनी वारंवार केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-११-२०२२) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.

तथापि, सदर योजनेतून केलेल्या कामांच्या अनुषंगाने जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प. पालघर व गट विकास अधिकारी, पं.स. जव्हार यांनी दि. २३.०२.२०२२ रोजी संयुक्त भेट दिली असता, सदरहू ठिकाणी बसविण्यात आलेल्या १६ सोलार दिव्यांपैकी ५ सोलार दिव्यास सोलार पॅनेल व बॅटरी आढळून आलेली नाही. त्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्याकरीता गट विकास अधिकारी , पं.स. जव्हार यांना कळविण्यात आले आहे .

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे हिंगणा भोटा (ता. नांदुरा, जि.बुलढाणा) गावांच्या पुनर्वसनाबाबत**

**(२३) ३७९९० (०७-०४-२०२२). अॅड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हिंगणा भोटा (ता. नांदुरा, जि.बुलढाणा) हे गाव जिगाव प्रकल्पात बाधित होत असल्यामुळे या गावाचे पुनर्वसन मौजे कालवड (ता.शेगाव) येथे प्रस्तावित केले असून, सदर पुनर्वसन मौजे कालवड शिवारात करण्यात येऊ नये याबाबत येथील स्थानिक शेतकऱ्यांनी त्यांच्या स्वाक्षरीसह जिल्हाधिकारी बुलढाणा यांना दिनांक १२/०८/२०२१ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता जिगाव प्रकल्प पुनर्वसन विभाग खामगाव व उपविभागीय अभियंता यांना दिनांक १३/०८/२०२१ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील शेतकऱ्यांच्या दिलेल्या निवेदनाकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येऊन कलम ११ लावण्यात आले असल्याचे दिनांक १७ फेब्रुवारी २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे हिंगणा भोटा या गावाचे पुनर्वसन मौजे कालवड शिवारात ज्या शेतीवर करण्याचे नियोजित आहे ती शेती पश्चजलाच्या जवळ १२६ ते ४२० मीटरच्या आत येत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शेती गैरप्रकार करून संबंधित शेतकऱ्यांची संमती नसतानासुद्धा संपादित करत असल्यामुळे मौजे कालवड येथील शेतकरी भूमिहीन होत असल्यामुळे शेतकरी व गावकरी यांच्या मनात असंतोषाची भावना निर्माण झाली हे खरे आहे काय,

(५) असल्यास, श्री जयनारायण कलंत्री यांनी आपली गाडेगाव बुद्रुक शिवारातील शेती हिंगणा भोटा या गावाच्या पुनर्वसनासाठी देण्यास संमती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मौजे हिंगणा भोटा या प्रकल्पबाधित गावाचे पुनर्वसन मौजे गाडेगाव येथे न करता मौजे कालवड शिवारात करण्यामागील कारणे काय आहेत,

(७) असल्यास, सदर पुनर्वसन मौजे कालवड येथे करण्याच्या प्रक्रियेला स्थगिती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही,

संबंधितांनी सादर केलेल्या दिनांक १२/०४/२०२१ निवेदनाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता जिगांव उपसा सिंचन विभाग खामगांव यांची दिनांक ३१/०५/२०२१ नुसार संबंधित अर्जदार यांना सविस्तर अवगत केले आहे, जिल्हा पुनर्वसन समितीने मौजे हिंगणा भोटा गावठाणाची स्थळ निश्चिती दिनांक २०/०१/२०२१ रोजीच्या सभेमध्ये केली आहे. त्यानुसार नविन गावठाणा करीता आवश्यक जमिनीचा भुसंपादन प्रस्ताव सादर करण्यात आला होता. संबंधित भुसंपादन अधिकारी यांनी कलम-११ दिनांक १२/०२/२०२१ रोजी प्रसिध्द केली आहे, दिनांक १७/०२/२०२० रोजी कोणतीही कलम-११ ची कार्यवाही केलेली नाही प्रसिध्द करण्यात आलेल्या कलम-११ च्या अधिसुचनेवर संबंधितांना आक्षेप सादर करणेकरीता ६० दिवसांचा कालावधी देण्यात आलेला होता प्राप्त आक्षेप तथा निवेदनांची पुर्तता कलम-१५ अंतर्गत करण्यात आलेली आहे संबंधितांचे निवेदनाकडे तथा आक्षेपाकडे दुर्लक्ष करण्यात आलेले नाही.
(३) मौजे हिंगणा भोटा गावाचे नविन पुनर्वसित गावठाणाचे ठिकाणी १:२५ पुर वारंवारीतेकरीता पश्चजल अभ्यासानुसार नविन गावठाणाचे पश्चजल पातळीपासून अंतर कमीत कमी १०७.२८ मीटर व जास्तीत जास्त अंतर ४१४.०० मीटर इतके आहे.
(४) संबंधित शेतकऱ्यांना त्यांनी त्यांची जमिन पुनर्वसनाचे कामाकरीता सरळ खरेदीने देण्याबाबत विचारणा करण्यात आली होती, परंतू संबंधित शेतकऱ्यांनी सरळ खरेदीने देण्यास नकार दिल्याने सदर क्षेत्राचा भुसंपादन प्रस्ताव तयार करुन मा.जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना सादर करुन त्यानुसार भूसंपादन अधिनियम २०१३ नुसार जमिन संपादनाची कार्यवाही करण्यात आली, तसेच भूमिहीन होणाऱ्या शेतकऱ्यांना लाभक्षेत्रामध्ये पर्यायी जमिनी राखीव ठेवण्यात आलेल्या असुन भुमिहीन होणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांनी पर्यायी जमिनीकरीता मागणी केल्यास लाभक्षेत्रामधील राखीव जमिन उपलब्ध करुन देण्यात येईल.
(५) होय हे खरे आहे,
परंतू मौजे हिंगणा भोटा ता. नांदुरा येथील बाधित गावठाणातील ग्रामस्थांची दिनांक २८/०८/२०२० चे ग्रामपंचयात ठरावानुसार मौजे हिंगणा भोटा व कालवड शिवारातील पुनर्वसीत गटांची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार जिल्हा पुनर्वसन समितीचे दिनांक २०/०१/२०२१ रोजीचे सभेमध्ये मौजे हिंगणा भोटा या गावठाणाची पुनर्वसन स्थळनिश्चती पुर्ण होवून त्यानुसार भूसंपादन अधिनियम २०१३ नुसार जमिन संपादनाची कार्यवाही करण्यात येत होती, परंतू सद्य:स्थितीत सदर क्षेत्र पश्चजल अभ्यासानुसार ५०० मीटरच्या आत येत असल्याने संपादनाची कार्यवाही रद्द करणेबाबत मा जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना संबंधित उपविभागीय अधिकारी यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.
(६) मौजे हिंगणा भोटा ता. नांदुरा येथील बाधित गावठाणातील ग्रामस्थांची दिनांक २८/०८/२०२० चे ग्रामपंचयात ठरावानुसार मौजे हिंगणा भोटा व कालवड शिवारातील पुनर्वसीत गटांची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार जिल्हा पुनर्वसन समितीचे दिनांक २०/०१/२०२१ रोजीचे सभेमध्ये मौजे हिंगणा भोटा या गावठाणाची पुनर्वसन स्थळनिश्चती पुर्ण झालेली होती. त्यानुसार भूसंपादन अधिनियम २०१३ नुसार जमिन संपादनाची कार्यवाही सुरु होती, तसेच मौजे हिंगणा भोटा या गावाचे लाभक्षेत्र मोठया प्रमाणात असल्याने सदर जमिनीची वहिती मौजे गाडेगांव येथुन करणे अडचणीचे होणार आहे, त्यामुळे संबंधित प्रकल्पग्रस्त यांना हिताचे होणेकरीता आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे असुन त्यानुसार मौजे- कालवड शिवारात पुनर्वसन केल्यास सदर पुनर्वसन लाभक्षेत्रातील जमिनीचे लगत असल्याने त्यांना जमिनीची वहिती करणे सोईचे व कमी कष्टाचे व कमी खर्चाचे होणार होते.
(७) मौजे हिंगणा भोटा या बाधित गावठाणाचे पुनर्वसनाकरीता भूसंप्रक्र ०१/२०२०-२१ मौजे हिंगणा भोटा ता. नांदुरा व भूसंप्रक्र ०१/२०२०-२१ मौजे कालवड ता .शेगांव या प्रकरणांत भुसंपादन अधिनियम २०१३ नुसार दोन्ही भूसंपादन प्रकरणे ही सद्यस्थितीत कलम २१ चे कार्यवाहीकरीता होते, परंतू सदर मौजे कालवड मधील शेतकरी यांनी रीट याचिका क्र. ५१२३/२०२१ मालुबाई काळे व इतर विरुध्द शासन हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असुन सदर प्रकरणामध्ये पक्षकाराने दाखल केलेले आक्षेपांचे अनुषगाने अहवाल सादर करणे आवश्यक होते, त्यानुसार मौका स्थळी सर्वेक्षण करुन पश्चजलापासुनचे नविन प्रस्तावित गावठाणाचे अंतर व तलांकाची मोजणी केली असता मौजे हिंगणा भोटा नविन पुनर्वसित गावठाणाचे अंतर शासन निर्णय दिनांक ०८/०३/२०१८ नुसार ५०० मीटरपेक्षा कमी येत आहे. त्यामुळे वरील शासन निर्णयातील

निकषानुसार प्रस्तावित गावठाण हे मानवी वस्तीचे दृष्टीने अयोग्य असल्याने मौजे हिंगणा भोटा या गावाचे प्रस्तावित गावठाण मौजे हिंगणा भोटा व कालवड या शिवारातील भुसंपादनाची कार्यवाही रद्द करण्यासाठी संबंधित उपविभागीय अधिकारी मलकापूर यांनी त्यांचे पत्र क्र.८००/२०२२ दिनांक १८/०५/२०२२ नुसार सदर प्रकरण रद्द करणेकरीता मा जिल्हाधिकारी यांना शिफारसीसह प्रस्ताव सादर केला आहे.

---

**मौजे घारोड व मौजे अटाळी (ता.खामगाव, जि. बुलढाणा) येथील तलावांचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(२४) ३८०४३ (०७-०४-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे घारोड व मौजे अटाळी (ता.खामगाव, जि. बुलढाणा) येथील साठवण तलाव क्रमांक दोन व पाझर तलाव या योजनेचे काम जमिनीचा मोबदला अभावी अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीचा मोबदला मिळणेबाबत सरळ खरेदीची कारवाई पूर्ण करून रुपये ४०१.३५ लक्ष निधीची मागणी दिनांक २५/६/ २०२१ रोजी वा त्यासुमारास व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ औरंगाबाद यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे अटाळी पाझर तलाव तालुका खामगाव या योजनेचे काम सुद्धा जमिनीचा मोबदला भावी अपूर्ण अवस्थेत असून सरळ खरेदी प्रस्ताव माननीय जिल्हाधिकारी बुलढाणा यांना सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर गावातील ज्या शेतकऱ्यांची जमीन तलावा करिता संपादित केली आहे त्या शेतकऱ्यांना त्वरीत मोबदला देऊन मौजे घारोड येथील धरणाचे व मौजे अटाळी येथील पाझर तलावाचे काम तात्काळ सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१०-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) कोविड-१९ साथ रोगाच्या आपात परिस्थितीमुळे आर्थिक टंचाईच्या कारणाने महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांना अंशतः निधी प्राप्त झाला होता. त्यामुळे मौजे घारोड साठवण तलाव क्रमांक ०२ या योजनेच्या सरळ खरेदीच्या एकूण रुपये ४०१.३४ लक्ष रकमेपैकी रुपये २००.०० लक्ष रक्कम प्रदान करण्यात आले होते त्यानंतर २२ मार्च २०२२ नंतर उर्वरित रुपये २०१.३५ रु. अदा करण्यात आले आहे. सदर योजनेचे भुसंपादनाचे देयक प्रलंबित नाहीत.

तसेच मोजे अटाळी पाझर तलाव योजना आर्थिक मापदंडात असफल होत असल्याने सदर योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव प्राप्त असुन त्यावर शासन स्तरावरुन तांत्रिक मुद्दे उपस्थित केले आहेत. त्याची पुर्तता झाल्यानंतर सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तालुका करमाळा (जि. सोलापूर) येथील संगणक परिचालकांच्या विविध मागण्यांबाबत**

**(२५) ३८२९९ (०७-०४-२०२२). श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि. सोलापूर) तालुक्यातील संगणक परिचालक २०११ पासून ग्रामपंचायत स्तरावर ७ हजार रुपये मासिक वेतनावर कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी कर्मचाऱ्यांना कामाचे तास वाटून न देता दिवसातून १२ तासापेक्षा जास्त काम या परिचालकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिचालकांनी त्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन संबंधित अधिकाऱ्यांकडे वेळोवेळी देऊनही अद्यापपर्यंत कोणताही निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने परिचालकांच्या विविध मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२४-११-२०२२) :** (१) ग्रामविकास विभागाच्या,शासन निर्णय दि.१४ जानेवारी,२०२१ अन्वये राज्यातील केंद्र चालक यांना रू.७०००/- इतके मानधन देण्यात येत आहे.
(२) व (३) ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णय दि.२४ ऑगस्ट,२०१८ अन्वये केंद्रचालकांद्वारे देण्यात येणा-या G२G व G२C या सेवा ग्रामपंचायतीच्या कामाशी निगडीत असल्याने हे काम ग्रामपंचायतीच्या कार्यालयीन वेळेत त्यांनी करणे आवश्यक आहे. तसेच केंद्रचालक B२C (उदा.लाईट बिल भरणा,रेल्वे आरक्षण इ.) सेवा खाजगी उद्योजक या नात्याने देत असल्याने ते काम कार्यालयीन वेळेनंतर स्वेच्छेने थांबून केंद्रचालकाद्वारे केले जाऊ शकते.त्यामुळे याबाबत स्वतंत्र निर्णय घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आयटीआय संस्थांमधील प्रवेशाबाबत

**(२६) ३८४०३ (०९-०४-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय आयटीआय प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांची सर्वाधिक पसंती असल्याचे तर खाजगी आयटीआय संस्थांमधील जागा मोठ्या प्रमाणात रिक्त राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, भविष्यात मोठ्या प्रमाणात नोकरीच्या संधी असलेल्या डेटा सायन्स, डिजिटल, मार्केटिंग, रोबोटिक्स, ब्लॉकचेन यासारखे सुसंगत अभ्यासक्रम आयटीआय संस्थामंध्ये सुरू करण्यासाठी शासन विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, आयटीआय प्रवेश वाढीसाठी शासन स्तरावर उपाययोजना करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०२-११-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, भविष्यात मोठ्या प्रमाणात नोकरीच्या संधी असलेले अभ्यासक्रम सुरु करणे शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) होय, हे खरे आहे. त्यानुषंगाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रवेश वाढीसाठी प्रोत्साहन अभियान व स्कूल कनेक्ट कार्यक्रम हे उपक्रम राबविले जातात.
(४) लागू नाही.

---

## प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मंजूर घरकुलाचे प्रगतीपथावर असलेले बांधकाम व अनुदान थांबविल्याबाबत

**(२७) ३८४१० (२२-०३-२०२२). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामपंचायत खरडा (ता. मौदा, जि. नागपूर) येथील श्रीमती. सुनंदा लटारू नरोले यांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल मंजूर झाले असून त्यांना पहिला हप्त्या मिळालेला आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, उक्त घराचे बांधकाम स्लॅबपर्यंत पूर्ण झाल्यानंतर सदरहू प्लॉट झुडपी असल्याचे सांगून बांधकाम व अनुदान थांबविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदृअनुषंगाने सदर प्लॉट झुडपी असून लाभार्थ्याकडे कर आकारणीची प्रत उपलब्ध असूनही बांधकाम व अनुदान थांबविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-११-२०२२)** : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
लाभार्थीला रु.१,२०,०००/- अनुदानाची संपूर्ण रक्कम टप्प्यानुसार पंचायत समिती स्तरावरुन वितरीत करण्यात आलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी पारधी जमातीच्या केंद्र प्रमुखास निलंबित केल्याबाबत

**(२८) ३८५८७ (१९-०४-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री.दिगंबर उमराश काळे या आदिवासी पारधी जमातीच्या केंद्र प्रमुखास खोटया माहितीच्या आधारे व नैसर्गिक न्याय तत्वाचा भंग करुन निलंबित केल्याबाबत चौकशी करण्याचे आदेश उप सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय यांनी दिनांक २ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय यांना लेखी पत्रान्वये कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेशान्वये चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले, चौकशीच्या अनुषंगाने श्री.दिगंबर काळे यांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर विषयाबाबत सन्माननीय सदस्यंकडून प्राप्त निवेदनात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने नियमोचित कार्यवाही करण्याचे विभागीय आयुक्त ,पुणे विभाग, पुणे यांना कळविण्यात आले आहे.
(३ ) प्रश्न उद्भवत नाही .

---

## माजलगाव (जि.बीड) सिंदफना नदीवर पुल बांधणेबाबत

**(२९) ३८६७१ (०१-०४-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माजलगाव (जि.बीड) मतदार संघातील सिंदफना नदीवर माजलगाव शहराजवळ दक्षिणमुखी हनुमान मंदिराजवळ निम्न पातळी पुल बांधणेबाबतच्या अंदाजपत्रकास तत्वत: मान्यता देणे बाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १३.११.२०२१ रोजी वा त्या सुमारास मा.मंत्री (जलसंपदा) यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाची चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले त्यानुसार उक्त प्रकरणास शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर कामाचा समावेश जायकवाडी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता प्राप्त करुन घ्यावी व दि.०९.०९.२०१५ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वांनुसार सुप्रमाबाबत पुढील कार्यवाही करण्याबाबत गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार

दि.०९.०६.२०२२ रोजीच्या नियामक मंडळाच्या ८० व्या बैठकीत सदर प्रस्तावास जायकवाडी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत समाविष्ट करण्यास गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद च्या नियामक मंडळाची मान्यता प्राप्त झालेली असून पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मूल (जि.चंद्रपूर) येथे पंतप्रधान आवास योजना निधी अभावी रखडल्याबाबत

**(३०) ३८६९९ (०१-०४-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मूल (जि.चंद्रपूर) येथे पंतप्रधान आवास योजना केंद्र शासनाच्या निधी अभावी प्रलंबित असल्याचे दिनांक ४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२१ मध्ये मान्यता देण्यात आलेल्या ३४ लाभार्थीची कर्ज काढून उभारलेली घरे अपूर्ण स्थितीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडून पंतप्रधान आवास योजनेचा निधीचा पाठपुरावा उपलब्ध होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे भाजेगाव (ता.गेवराई, जि.बीड) येथील इजिमा पुलाच्या बांधकामासाठी निधी मिळण्याबाबत

**(३१) ३८७६२ (०१-०४-२०२२). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
( १) मौजे भाजेगाव (ता.गेवराई, जि.बीड) येथील इजिमा ११७ वरील अमृतानदी वरील पुल सन २०२० मध्ये वाहून गेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलावरून उक्त गावातील दोन व्यक्ती पुराच्या पाण्यात वाहून गेल्यामुळे त्यांना आपला जीव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पुलाबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी करून देखील अद्यापही सदर पुलाच्या बांधकामाचा प्रश्न मार्गी लागला नसल्याने, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बीड यांना सदर पुलाच्या बांधकामासाठी कोणत्या योजनेमधून निधीची तरतूद करण्यात आली आहे. याबाबतची माहिती प्राप्त होण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त ठिकाणच्या पुलामुळे होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी सदर पुलाचे बांधकाम त्वरीत करण्याकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. गिरीश महाजन (२३-११-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सदर ठिकाणच्या पुलाच्या बांधकामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२ अंतर्गत रु.१००.०० लक्षची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून पुलाच्या बांधकामासंदर्भात पुढील कार्यवाही जिल्हा परिषदेद्वारे सुरु करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे तालुक्यातील लोणखेडी फाटा ते नांद्रे रस्त्याची फार दुरावस्था झाली असल्याबाबत**

**(३२) ३९०७८ (०१-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यातील लोणखेडी फाटा ते नांद्रे रस्त्याची दुरावस्था झाली असून या रस्त्याची दुरुस्ती करून डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांनी शासनाकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने रस्त्याची दुरुस्ती त्वरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-११-२०२२) :** (१) हे, खरे आहे.

(२) लोनखेडी फाटा ते नांद्रे रस्ता यामध्ये इजिमा क्र.१८ व इजिमा क्र.५१ या दोन रस्त्यांचा समावेश असून त्याची एकूण लांबी ८.०० कि.मी.एवढी आहे. सदर रस्त्याची १ कि.मी. लांबी सुस्थितीत असून उर्वरीत नादुरुस्त असलेल्या रस्त्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने जिल्हा वार्षिक योजनेकडे सादर केलेला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार रस्ता दुरुस्त करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या निविदा प्रकरणात झालेला गैरव्यवहाराबाबत**

**(३३) ३९१६० (०१-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत उस्मानाबाद जिल्ह्यातील ८ तालुक्यांपैकी २ तालुके वगळून इतर ६ तालुक्यांची निविदा एकत्रित करण्याचे आदेश राज्य शासनाकडून पत्र जा.क्र. ग्रासयो-२०२१/प्र.क्र.१९२/बांधकाम-१, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी कार्यकारी अभियंता (प्रमग्रासयो) यांना देण्यात आले होते, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, राज्य शासनाकडून राज्यामध्ये इतर जिल्हयामध्ये प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत प्रसिध्द केलेल्या निविदा प्रक्रिया उस्मानाबाद जिल्हयाप्रमाणेच केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजुर असलेली कामे जिल्हेयातील ८ तालुक्यांसपैकी २ तालुके वगळून इतर ६ तालुक्यांची एकत्रित प्रसिध्द करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राद्वारे कळविलेले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रसिध्द केलेल्या निविदा या लोकप्रतिनिधींच्या दबावाखाली प्रसिध्द करण्यास भाग पाडलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तसेच जिल्हायातील ८ तालुक्यांपैकी ६ तालुक्यातील कामांच्या एकत्रित निविदा प्रसिध्द करण्यात आल्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना करण्यात आली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२२-११-२०२२) :** (१) हे अशंतः खरे आहे.

मा.स्थानिक खासदार यांनी राष्ट्रीय ग्रामीण पायाभूत सुविधा विकास संस्था, नवी दिल्ली (NRIDA) यांचेमार्फत केलेल्या विनंतीस अनुसरुन शासनस्तरावर निर्णय घेऊन दि.१४.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये उस्मानाबाद जिल्ह्यातील ८ तालुक्यांतील एकूण १७ कामांची निविदा एकत्रित प्रसिद्ध करण्याबाबत कळविण्यात आले होते.

तथापि, स्थानिक लोकप्रतिनिधींनी विनंती केल्यानुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व मंजुर कामांची एकत्रित निविदा प्रक्रिया न-राबविता शासनस्तरावर निर्णय घेऊन उमरगा व लोहारा मतदारसंघातील ०२ कामांची तसेच २४३-परंडा मतदारसंघातील भूम-परंडा-वाशी तालुक्यांतर्गत ०५ कामांची निविदा प्रक्रिया स्वतंत्रपणे राबविण्यात आली.

उर्वरित ०३ तालुक्यातील (उस्मानाबाद-तुळजापूर-कळंब) एकूण १० कामांच्या एकत्रित निविदा प्रक्रिया मा.स्थानिक खासदार यांचे विनंतीनुसार स्वतंत्रपणे राबविण्यात आली.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील लघु पाटबंधारे योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३४) ३९२५५ (०१-०४-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील जलसंधारण विभागामार्फत ९ लघु पाटबंधारे योजनांना मंजूरी देवून सुमारे पाच वर्षाचा कालावधी होऊन सुध्दा अद्यापपर्यंत सदर लघु पाटबंधारे योजनांना निधी उपलब्ध करुन दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ९ लघु पाटबंधारे योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१०-२०२२) :** (१) होय, अशंत: खरे आहे.

(२) प्रकल्पाची प्रगती व आणि निधीची मागणी घेण्यानुसार आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यानुसार ०४ लघु पाटबंधारे योजनांसाठी निधी देण्यात आला आहे, उर्वरित ०५ योजनांची वनजमीन संपादन कार्यवाही सद्या प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा वडोली येथे झालेला गैरप्रकार

**(३५) ३९२५६ (०१-०४-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील पंचायत समिती जव्हार अंतर्गत जिल्हा परिषद शाळा वडोली येथील शिक्षक श्री.धनराज पुंडलिक डावले यांच्याबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्याने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पालघर यांनी गट विकास अधिकारी जव्हार यांना दिनांक ३० सप्टेंबर,२०२१ रोजी वा त्या सुमारास पत्र पाठवून सुधारित चौकशी अहवाल सादर करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-११-२०२२) :** (१) व (२) श्री. धनराज पुंडलीक डावले, प्राथ. शिक्षक यांच्याबाबत लोकप्रतिनिधींकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारींच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी दिनांक ३०/०९/२०२१ अन्वये गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जव्हार यांना चौकशी करून अहवाल सादर करणेबाबत कळविले होते. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जव्हार यांनी दि. २९/१२/२०२१ अन्वये जिल्हा परिषदेस चौकशी अहवाल सादर केला होता. सदर अहवालानुसार श्री. धनराज पुंडलिक डावले, पदवीधर

शिक्षक यांचे बाबत तक्रारीत नमूद केलेले आरोप हे सिद्ध होत नाहीत, असे चौकशी अधिकारी यांचे मत आहे. याबाबत सन्माननिय लोकप्रतिनिधींना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावरुन अवगत करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सार्वजनिक पथदिव्यांचे व पाणीपुरवठा योजनचे वीजबील थकबाकीबाबत

**(३६) ३९३६७ (१२-०४-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाणीपुरवठा योजनांकडे २ हजार ६०७ कोटी आणि सार्वजनिक पथदिव्यांचे ६ हजार ३१६ कोटी असे एकूण ९ हजार १३८ कोटी आणि कृषी वीज पंपाचे ४१ हजार १७५ कोटी रुपयांची वीजबिल थकबाकी आणि शासनाकडील थकीत अनुदान त्वरित देण्याची मागणी मा. उर्जा मंत्री यांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामविकास विभागाने पथदिव्यांच्यासाठी वीजपुरवठा पोटी ५८८१ कोटी रूपये व सार्वजनिक पाणी पुरवठा विभागातील वीज पुरवठयासाठी १९८४ कोटी रूपये तसेच नगरविकास विभागाने सार्वजनिक पथदिव्यांसाठी लागणाऱ्या वीज पुरवठयापोटी ४३५ कोटी रूपये व थकीत ६२४ कोटी रूपये असे एकूण जवळपास ८००० कोटी रूपये महावितरणाला देणे बाकी असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नगरविकास विभाग व ग्रामविकास विभागाने हजारो कोटी रुपये थकविल्यामुळे महावितरण तोटयात जात असून त्याचा भूर्दंड नागरिकांना सोसावा लागणार आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू थकबाकीमुळे महावितरणाने गावा-गावातील पथदिव्यांचा व पाणी पुरवठयांचा वीज पुरवठा खंडीत करणे सुरु केल्याने ग्रामपंच्यातीची ही देयके १५ व्या वित्त आयोगाच्या निधिमधून अथवा घर टॅक्स वसुलीमधून भरावेत अशा सूचना दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तसेच संबंधित विभागाची हजारो कोटी रूपयाची थकबाकी महावितरणाला देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-११-२०२२) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

माहे जानेवारी,२०२२ अखेर ग्रामविकास विभागांतर्गत ग्रामपंचायती व जिल्हा परिषद यांचे पथदिव्यांच्या वीज जोडण्यांचे रु.५९५१.२६ कोटी तसेच सार्वजनिक पाणीपुरवठा यांच्या वीज जोडण्याचे रु.२०४१.९८ कोटी असे एकूण रु.७९९३.२४७ कोटी रुपये महावितरणला देय आहेत.

तसेच माहे मार्च,२०२२ अखेर नगरविकास विभागांतर्गत पथदिव्यांच्या वीज जोडण्यांचे रु.४३५ कोटी तसेच सार्वजनिक पाणीपुरवठा यांच्या वीज जोडण्यांचे रु.६२०.२० कोटी असे एकूण रु.१०५५.२०६ कोटी रुपये महावितरणला देणे आहेत. नगर विकास विभाग व ग्रामविकास विभागाकडे महावितरणची एकंदरीत सुमारे रु.९०४८.४५ कोटी रुपयांची थकबाकी आहे.
(३) हे खरे नाही.

नगरविकास विभाग व ग्रामविकास विभागाकडून पथदिव्यांचे तसेच पाणीपुरवठा योजनाचे वीज देयकांची रक्कम महावितरणला अदा करण्यासाठी नियमित अनुदान तसेच पुरवणी मागणीद्वारे निधी उपलब्ध करुन घेण्यात येत असल्याने या विभागांच्या विद्युत देयकाच्या थकबाकीमुळे महावितरण तोटयात जात असल्याचे म्हणता येणार नाही.

(४) हे अंशत: खरे आहे.

ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक २३ जून, २०२१ व शासन शुध्दीपत्रक, दिनांक २ जुलै, २०२१ अन्वये ग्रामपंचायतींना विज देयकांची रक्कम प्रथम स्वउत्पन्नातून भरण्याचे व रक्कम कमी पडली तरच १५ व्या वित्त आयोगाच्या अबंधित अनुदानतून अदा करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) ग्रामपंचायतींच्या क्षेत्रातील पथदिवे आणि ग्रामीण पाणीपुरवठा योजनांवरील वीज देयकांच्या थकबाकीचा आढावा घेण्याची कार्यवाही सुरू आहे. ग्रामपंचायतींच्या पथदिव्यांच्या विद्युत देयकांची थकबाकी अदा करण्यासाठी पुरवणी मागणी प्रस्ताव मान्य करण्यात आली आहे. त्यामधून थकबाकीची रक्कम महावितरणला अदा करण्यात येईल. तसेच मा.उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३.७.२०२२ रोजी विद्युत देयकांच्या थकबाकीच्या अनुषंगाने आढावा घेण्यात आला असून ऊर्जा विभागास पथदिवे व पाणीपुरवठा योजनांच्या विद्युत बिलांच्या थकबाकीबाबत सुयोग्य योजना तयार करुन प्रस्ताव करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कानडखेड (ता.पुर्णा, जि.परभणी) शिवारात अनधिकृतरित्या कत्तलखाना सुरू असल्याबाबत

**(३७) ३९४५० (०७-०४-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कानडखेड (ता.पुर्णा, जि.परभणी) शिवारात अनधिकृतरित्या कत्तलखाना सुरू असून सदरहू कत्तलखान्यामुळे परिसरात दुर्गंधी व घाणीचे साम्राज्य पसरुन, जलस्त्रोत दुषित होऊन नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कत्तलखान्यात येणाऱ्या पशुंची कोणतीही वैद्यकीय तपासणी न करता त्यांची कत्तल करण्यात येते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदरहू कत्तलखाना बंद करण्याबाबत स्थानिक नागरीकांनी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकरी,परभणी यांना माहे फेब्रुवारी,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ठिकाणची पहाणी केली आहे काय, पहाणीच्या अनुषंगाने कत्तलखाणा बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-११-२०२२) :** (१) नाही, हे खरे नाही .

सदरहू कत्तलखाना अपेडा (APEDA) नोंदणीकृत (नोंदणी क्र.APEDA/१६६) असुन तो अनाधिकृत नाही. तसेच, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत कत्तलखान्यावरील प्रदुषणाबाबत नियमितपणे तपासणी केली जाते.

(२) नाही, हे खरे नाही .

सदर कत्तलखान्यावर पाच सक्षम अधिका-यामार्फत महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्याचे अनुषंगाने जनावरांची कत्तलपुर्व तपासणी केली जाते .

(३) होय, हे खरे आहे .

या बाबत नागरिकांनी जिल्हा प्रशासनाकडे तक्रार केली आहे.

(४) होय, जिल्हाधिकारी यांच्या सुचनेप्रमाणे पशुसंवर्धन विभागातर्फे तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करून चौकशी अहवाल जिल्हा प्रशासनास सादर केला आहे. सदर कत्तलखाना अधिकृत असल्याने बंद करणे बाबत कुठलीही कार्यवाही प्रस्तावित केली नाही .

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुर्णा (जि. परभणी) तालुक्यातील ६० ते ७० गावांना स्मशानभूमी शेड बांधकामास निधी देणेबाबत

**(३८) ३९४७० (२९-०३-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्णा (जि. परभणी) तालुक्यातील जवळपास ६० ते ७० गावांना स्मशानभूमीस शेड नसल्याने मृतदेहांची विटंबणा होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील गावांतील स्मशानभूमीत शेड नसल्याने पावसाळयात मृतदेहास अग्नी देण्यास अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी (गंगाखेड) यांनी मा.अल्पसंख्याक मंत्री यांना दिनांक २०.१२.२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन पुर्णा तालुक्यातील ६० ते ७० गावांना नवीन स्मशानभूमी शेड बांधकामांकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त मागणीनुसार पुर्णा तालुक्यातील ६० ते ७० गावांना नवीन स्मशानभूमी शेड बांधकामांकरीता त्वरीत निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-१२-२०२२) :** (१) व (२) अंशत: खरे आहे. तथापि, या गावातून धार्मिक रीतिरिवाजाप्रमाणे अंत्यसंस्कार केले जातात. त्यामुळे मृतदेहाची विटंबना होत नाही.

(३) होय.

(४) पुर्णा तालुक्यामध्ये ११ ग्रामपंचायतींमध्ये स्मशानभूमी शेड बांधकाम मंजूर असून कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच १३ ठिकाणी सार्वजनिक जागा उपलब्ध नसल्याने अशा ठिकाणी खाजगी व्यक्तीकडून जागा मिळविण्याचा प्रयत्न आहे. इतर ठिकाणी निधी व जागा उपलब्धतेनुसार कार्यवाही शक्य आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा परिषद मधील असंतुलित सेस निधि वाटपाबाबत स्थगिती देऊनही निधि वापरण्यात आल्याबाबत

**(३९) ३९५२० (२९-०३-२०२२). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामविकास मंत्री यांनी सन २०१९ - २० मध्ये जिल्हा परिषद मधील असंतुलित सेस निधी वाटपाबाबत स्थगिति दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू असंतुलीत सेस निधि वाटपाबाबत स्थगिति देऊन सुद्धा निधि वापरण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदअनुषंगाने सदरहू दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नाही, हे खरे नाही.

जिल्हा परिषद सेस अंतर्गत सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक तयार करताना शासन निर्णयातील तरतुदीनुसार २०% समाजकल्याण विभाग, १०% महिला व बालकल्याण विभाग, २०% ग्रामीण पाणीपुरवठा व ५% अंपगकल्याण विभागासाठी तरतूद करण्यात आलेली आहे.त्याचप्रमाणे अंदाजपत्रकास संबधित विषय समितीची मंजुरी घेऊनच अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

शासनाच्या दि. १७.०३.२०२० रोजीच्या पत्रान्वये सोलापूर जिल्हा परिषदेच्या सेस निधी वाटपास स्थगिती देण्यात आलेली आहे. त्यानुसार सोलापूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीने सेस निधीमधून सन २०१९-२० मध्ये कार्यारंभ आदेश मिळालेली कामे वगळता उर्वरित प्रशासकीय मंजुरी दिलेली रु. ३४०.६० कोटी इतक्या निधीची कामे दि. २७.०७.२०२० रोजीच्या ठरावान्वये रद्द करण्यास मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार दि. २१.१०.२०२० रोजीच्या प्रशासकीय आदेशान्वये सदर कामे रद्द करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देगांव (जि. सातारा) इथनिक फूड प्रा.लि. कंपनीतील अपघातग्रस्त कामगारांना भरपाई मिळणेबाबत**

**(४०) ३९६०० (०७-०४-२०२२). श्री.महेश शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इथनिक फूड प्रा.लि. देगांव, (जि. सातारा) कंपनीतील अपघातग्रस्त कामगार श्री. गौरव विजय माने यांना वैद्यकीय खर्चासह भरपाई देण्याचे आदेश कंपनी व्यवस्थापनास देणेबाबत मा. उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना स्थानिक लोकप्रतिनिधी दि.१३.१०.२०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अपघातग्रस्त कामगारास वैद्यकीय खर्चासह भरपाई देणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०९-११-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) मे.इथनिक फूड प्रा.लि.,देगांव, (जि.सातारा) या आस्थापनेतील श्री.गौरव विजय माने यांच्या अपघात प्रकरणाची उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,पुणे (कार्यक्षेत्र-१) यांनी दि.२.२.२०२२ रोजी कारखान्यास प्रत्यक्ष भेट देऊन चौकशी केली आहे.

मे.सातारा फूड मेगा फूड पार्क प्रा. लि., देगाव, ता.व जि. सातारा हा कारखाना औद्योगिक सुरक्षा व आारोग्य संचालनालयाकडे नोंदणीकृत नाही.

सदर कारखान्यामध्ये फळांपासून रस व लगदा बनवून त्याचे पॅकेजिंग व शीतकरण करण्याचे काम केले जाते.मे.इथनिक फूड प्रोडक्ट सोल्युशन लि., या आस्थापनेतील काही कामगार मे.सातारा फूड मेगा फूड पार्क प्रा. लि.,या कारखान्यात उत्पादन प्रक्रियेचे काम करतात.

श्री.गौरव विजय माने हा कामगार मे.इथनिक फूड प्रोडक्ट सोल्युशन लि., आस्थापनेमार्फत मे.सातारा मेगा फुड पार्क प्रा.लि., या कारखान्यात काम करीत असतांना दि.२९.१.२०२० रोजी नायट्रिक ॲसिडची हाताळणी करीत असताना श्री.माने यांच्या चेहऱ्यास, उजवा हात व उजव्या पायास भाजले. वैद्यकीय उपचाराकरीता श्री.माने यांना त्वरीत सातारा हॉस्पिटल व रिसर्च सेंटर,सातारा येथे दाखल केले.वैद्यकीय उपचारानंतर श्री.गौरव माने यांना दि.११.२.२०२० रोजी घरी सोडण्यात आले आहे.

कारखाना व्यवस्थानाने श्री.गौरव माने यांच्या सातारा येथील वैद्यकीय उपचाराचा रू.१,१४,६२०/- व मुंबई येथील वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रियेचा रू.२,७४,२७९/- असा एकूण रू.३,८८,८९९/- इतका खर्च केला आहे.

नुकसान भरपाई देणेबाबत आयुक्त, नुकसान भरपाई,सातारा यांचेमार्फत कारखाना व्यवस्थापनास दि.१७.२.२०२२ रोजी नोटीस पाठविण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र कारखाने नियम,१९६३ मधील तरतुदीचे उल्लंघनाबाबत कारखान्याचे भोगवटादार व व्यवस्थापक यांचेविरुध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, सातारा यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर तालुक्यातील (जि. रत्नागिरी) वाडातिवरे गावचा रस्ता तालुक्याच्या रस्त्यास जोडण्याबाबत**

**(४१) ३९८७० (३१-०३-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि. रत्नागिरी) तालुक्यातील वाडातिवरे हे महसूली गाव असून रस्त्याची सोय नसल्याने ग्रामस्थांना किमान दीड ते दोन तास पायपीट करुन तालुक्याला पोहचावे लागते, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, या गावाला उत्तम समुद्र किनारा लाभलेला असून मोठे सुरुबनही असून पर्यटनाच्या दृष्टीनेही एक उत्तम ठिकाण असूनही रस्त्याअभावी पर्यटक समुद्र किनाऱ्यापर्यंत पोहचू शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तालुक्याला वाडातिवरे गावाला जोडणारा रस्ता करण्यात यावा म्हणून येथील ग्रामस्थांनी मागील अनेक वर्षांपासून शासन स्तरावर सातत्याने मागणी केलेली असतानाही त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याने या गावाचा विकास होवू शकला नाही तसेच शाळकरी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या गावासाठी तालुक्याला जोडणाऱ्या रस्त्याची मागील अनेक वर्षांपासूनची सातत्याने मागणी असतानाही शासनाकडून रस्ता तयार न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुसार उक्त गावचा रस्ता तालुक्याच्या ठिकाणच्या रस्त्यास जोडण्याच्यादृष्टीने तसेच पर्यटनाच्या दृष्टिने विकास होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-११-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

रस्ते विकास आराखडा सन २००१-२१ नुसार वाडा तिवरे भराडीन कणेरकर वाडी लिंगायत वाडी ठाकरेवाडी पडवणेहा रस्ता ग्रामा क्र.१३ दर्जाचा असून सदर रस्त्याची एकूण लांबी ५.०० कि.मी.असून प्रत्यक्षात अस्तित्वातील लांबी ४.१००कि.मी इतकी आहे. वाडा तिवरे गावापासून समुद्रकिनाऱ्याची लांबी १/८५० कि.मी. इतकी आहे.

सदर रस्त्यासाठी आमदार स्थानिक विकास कार्यक्रमातून रु.१०.०० लक्ष व रस्ते व पुल परिरक्षण कार्यक्रम गट अ अंतर्गत रु.१.००लक्ष असा एकूण रु.११.०० लक्ष निधी मंजूर असून काम प्रगतीपथावर आहे.

तसेच नादुरुस्त रस्त्याचा प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजनेतून पर्यटन विकास कार्यक्रमा अंतर्गत सादर करुन निधी मिळवून रस्त्याचे काम करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड-पोलादपूर (जि.रायगड ) येथील जिल्हा परिषदेच्या रस्त्यांची दुरुस्तीबाबत**

**(४२) ३९८८० (०७-०४-२०२२). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड-पोलादपूर ( जि.रायगड ) तालुक्यात दिनांक २२ जुलै,२०२१ रोजी झालेल्या महापुरामुळे जिल्हा परिषदेच्या अंतर्गत जिल्हा परिषद व ग्रामीण भागात येणाऱ्या रस्त्यांची मागील दोन वर्षात झालेल्या महापुरामुळे अत्यंत दुरावस्था झाली असून उक्त रस्त्यांची दुरुस्ती निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी - फेब्रुवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जागोजागी भुसःखलन होऊन गावांना जोडणाऱ्या जिल्हा परिषद व ग्रामीण रस्त्यांची आणि रस्त्यांवरील पुल व रस्त्यालगतच्या संरक्षण भिंतीचे नुकसान झाले असून सदर रस्त्यावरुन वाहतूक करणे गैरसोयीचे झाले असून दळणवळणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करुनही तालुक्यातील रस्ते, पुल आणि संरक्षण भिंत इतर कामे अदयाप झालेली नसल्याने ग्रामस्थ, वाहन चालक, विद्यार्थी,वयोवृध्द आदिंना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्नुसार तालुक्यातील जिल्हा परिषद व ग्रामीण रस्त्यांच्या दुरुस्ती विनाविलंब मंजूरी देऊन निधी त्वरीत मिळून उक्त रस्ते पूर्ववत होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-११-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) रस्ते विकास आराखडयानुसार रायगड जिल्ह्यातील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांची एकूण लांबी ५७३७.४० किमी एवढी आहे. त्यापैकी महाड व पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांची एकूण लांबी ११५५.१५ कि.मी. एवढी आहे.

रस्ते व पुल दुरुस्तीच्या योजनांमध्ये उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांची लांबी व मानव विकास निर्देशांक विचारात घेऊन करण्यात येते. रायगड जिल्ह्यातील महाड व पोलादपूर तालुक्यासाठी सन २०१९-२० ते २०२१-२२ या आर्थिक वर्षात खालील प्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे :-

(रु.लक्ष)

| अ.क्र | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ |
|---|---|---|---|
| रस्ते व पूल दुरुस्ती अंतर्गत (३०५४-२४१९) | १५५.०० | ५०.०० | ३०.०० |
| जिल्हा वार्षिक योजना (३०५४-५०५४) | २९६.३८ | ४६०.८२ | ३४.५८ |
| एकूण | ४५१.३८ | ५१०.८२ | ६४.५८ |

तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार रस्ते दुरुस्त करण्याचे जिल्हा परिषदेचे प्रयत्न आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाड (जि.रायगड) तालुक्यात महापुरामुळे झालेल्या नुकसानीच्या कामांना निधी मिळणेबाबत

**(४३) ३९८८६ (०१-०४-२०२२). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड ( जि.रायगड ) तालुक्यात गेल्या वर्षी आलेल्या महापुरामुळे तालुक्यातील विहिरी, तलावे, पाईपलाईन, आदिंचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामासंदर्भात जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव सादर करण्यात आल्यावर तो जलजीवन मिशनच्या कारण सांगून रदद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३ )असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त प्रकरणी तालुक्यातील विहिरी, तलावे, पाईपलाईन आदिंचे मोठया प्रमाणात झालेल्या नुकसानीच्या कामांना मंजूरी तसेच निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०४-११-२०२२) :** (१) होय,खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) पुरामुळे बाधीत झालेल्या नळ पाणी पुरवठा योजनांची अत्यावश्यक तात्पुरती दुरुस्ती करुन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

महापुरामुळे नुकसान झालेल्या विहिरी तलाव, पाईपलाईन इत्यादी २१७ कामे मंजूर असून त्यापैकी ४ कामे पूर्ण करण्यात आली असून उर्वरित २१३ कामे प्रगतीत आहे.

तसेच, माहे जुलै-२०२१ मध्ये झालेल्या पुर नुकसानीसाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधी वाटपाबाबतची कार्यवाही मदत व पुनर्वसन विभागाकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्धवत नाही.

---

**महाड ( जि.रायगड ) तालुक्यातील श्री.झोलाई देवी मंदिर, विन्हेरे या पर्यटन स्थळास '' क'' दर्जा देण्याबाबत**

**(४४) ३९८८७ (०९-०४-२०२२). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड ( जि.रायगड ) तालुक्यातील श्री.झोलाई देवी मंदिर विन्हेरे या पर्यटन स्थळास ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजनेअंर्तगत " क" दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-१२-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. जिल्हा नियोजन समिती दिनांक १२/०१/२०२२ रोजीच्या बैठकीत सदर स्थळास ‘‘क’’ वर्ग यात्रा स्थळ म्हणून मंजूरी देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्धवत नाही.

---

**अंजनगांव (ता.सुर्जी, जि.अमरावती) येथील लघु पाटबंधारे विभागीय कार्यालयात अधिकारी कर्मचारी नसल्याबाबत**

**(४५) ४००४० (११-०४-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगांव (ता.सुर्जी,जि.अमरावती) येथील लघु पाटबंधारे विभागाचे कार्यालय केवळ शोभेपुरतेच असून येथे काम करणारे अधिकारी/ कर्मचारी हे केवळ स्वाक्षरी करण्यासाठीच आठवडयातून एकदा कार्यालयात येत असल्याचे माहे जानेवारी,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कार्यालय हे वर्षातून बदलत असून या कार्यालयाच्या कार्यालय प्रमुख आणि कर्मचारी हे कधीच उपस्थित नसतात या प्रकरणी संबंधित लोकप्रतिनिधीनी शासनाकडे निवेदनाद्वारे निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त ठिकाणच्या लघुपाटबंधारे खात्यातील कामे प्रलंबित न राहण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१०-२०२२) :** (१) नाही.

(२) लागु नाही. परंतु मा. श्री बळवंत वानखडे (विधानसभा सदस्य) व इतर यांचे तारांकीत प्रश्न क्र. ४१२४४ नुसार विचारणा करण्यात आली होती.

(३) सदर कार्यालय हे सिंचन व्यवस्थापनाकरीता कार्यान्वित असुन शाखाधिकारी यांचेकडे या शाखा कार्यालयाचा कार्यभार अतिरीक्त स्वरुपात आहे. सदर शाखेत एकूण मंजूर २२ पदे असुन कार्यरत पदे १३ आहेत. तसेच यापैकी बहुतांश कर्मचारी हे सिंचन व्यवस्थापनाकरीता क्षेत्रिय कामावर असतात. सदर सिंचन शाखेत दोन दप्तर कारकून व १ शिपाई अशी कार्यालयीन पदे मंजुर आहेत. जे कार्यालयीन कामे पाहतात. त्यापैकी एक दप्तर कारकून मुख्य अभियंता, जलसंपदा

विभाग, अमरावती कार्यालयात प्रतिनियुक्तीवर आहे . त्यामुळे सिंचनाचे वेळी एक दप्तर कारकून व एक शिपाई शाखा कार्यालयात उपस्थित असतात. उक्त ठिकाणच्या लघु पाटबंधारे खात्यातील कामे प्रलंबित न राहण्यासाठी वेळोवेळी उपविभाग/विभागामार्फत आढावा घेतला जातो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यात "क"वर्ग दर्जा असलेल्या तीर्थक्षेत्र स्थळांच्या विकासासाठी निधी वाढवून देण्याबाबत**

**(४६) ४००९९ (०९-०४-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात "क"वर्ग दर्जा असलेल्या तीर्थक्षेत्र स्थळांची संख्या १५४ असूनही मिळणारा निधी अल्पप्रमाणात असल्याने या तीर्थक्षेत्रांचा विकास प्रलंबित असल्याच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी प्रशासनाकडून दरवर्षी पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत असली तरी ती अत्यंत कमी असल्याने भाविक/यात्रेकरूंना सांडपाणी व्यवस्थापन , वीज पाणी, दळणवळण ,यात्रेकरू निवास इत्यादी मुलभूत सोयी सुविधा पुरवणे स्थानिक स्वराज्य संस्थांना शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२९-११-२०२२) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) मंजूर तिर्थक्षेत्रे, निधी उपलब्धता व योजनेच्या अटी व निकष विचारात घेऊन तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी विकासाची कामे करण्यात येतात. "क" वर्ग दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्रांना निधी उपलब्धतेनुसार निधी देण्यात येतो. तथापि, शासनाने दि.२२/०२/२०२२ रोजीच्या शासननिर्णयान्वये "यात्रास्थळांच्या विकासासाठी जिल्हा परिषदांना अनुदान," या जिल्हा वार्षिक योजनेत रु.३०.०० लक्ष रक्कमेच्या मर्यादेत वाढ करून ती रु.६०.०० लक्ष इतकी करण्यात आली आहे. "क" वर्ग दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्रांना "ब" वर्ग दर्जा देण्यासाठी शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यास व योजनेच्या अटी व निकषांची पूर्तता झाल्यास निधी उपलब्ध करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आमखेड व अंबाशी (ता.चिखली, जि. बुलढाणा) तलावाच्या दुरुस्तीस निधी मिळणेबाबत**

**(४७) ४०३५१ (०५-०४-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमखेड व अंबाशी (ता.चिखली, जि. बुलढाणा) येथे दिनांक २९ /०६/२०२१ रोजी ढगफुटी सारखा पाऊस पडल्याने दोन्ही ठिकाणचे सिंचन तलाव फुटल्याने प्रचंड नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आमखेड व अंबाशी येथील तलावाच्या दुरुस्तीसाठी दीड कोटी रुपयांच्या निधीचा मागणीचा प्रस्ताव अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लघुपाटबंधारे बुलढाणा यांनी दिनांक ०६/ ०८ /२०१९ रोजी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९/०९/२०२१ व २९/१२/२०२२ रोजी मंत्री तथा सचिव मृद व जलसंधारण यांचेकडे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून तद्अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१०-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय,

जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद बुलडाणा यांच्या मार्फत चौकशीचा अहवाल जिल्हाधिकारी

कार्यालय, बुलडाणा यांना सादर करण्यात आला आहे, तसेच आमखेड धरण व अबांशी या धरणाची दुरुस्तीचे काम मुख्यमंत्री जलसंर्वधन योजनेअंतर्गत प्रस्तावित असून दुरुस्ती कामांना प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील बांधकाम व्यावसायिकांकडून सुरक्षा यंत्रणाचा वापर केला जात नसल्याबाबबत**

**(४८) ४०४७५ (०७-०४-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील बांधकाम व्यावसायिकांकडून आवश्यक सुरक्षा यंत्रणा वापरण्यात न आल्यामुळे नाशिक येथे एका बांधकाम मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकाम व्यावसायिकांकडून सुरक्षा यंत्रणाचा वापर केला जात नसल्याबाबत संबंधीतांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त भविष्यात अशा प्रकारची घटना पुन्हा होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१०-११-२०२२) :** (१) होय.

दै.लोकमत या स्थानिक वृत्तपत्रात दि.४.२.२०२२ रोजी प्रसिध्द झालेल्या बातमीवरुन नाशिक शहरात पेठ रोड, दत्तनगर, पंचवटी येथील घराचे (खाजगी मालक यांचे बांधकाम साईटवर) काम करतांना उंचीवरुन खाली कोसळून दि.२.२.२०२२ रोजी बांधकाम मजूराचा मृत्यू झाल्याची घटना नाशिक कार्यालयाच्या निदर्शनास आली.
(२) दै.लोकमत या स्थानिक वृत्तपत्रात दि.४.२.२०२२ रोजी प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने "आदित्य निवास" दत्तनगर, पेठरोड, पंचवटी या घटना स्थळी क्षेत्रीय निरीक्षक तथा सरकारी कामगार अधिकारी यांनी दि. २५.२.२०२२ रोजी भेट दिली. तेथील अपघात दुर्घटनेशी संबंधित कंत्राटदार श्री. रवी मोरे यांचेविरुध्द पंचवटी पोलीस स्टेशनमध्ये दिनांक १४.०२.२०२२ रोजी भादंवि ३०४ अ प्रमाणे गुन्हा क्र. ५७/२०२२ नोंदविण्यात आला आहे.
(३) सदर अपघातात मृत्यू झाल्याबाबत पंचवटी पोलीस स्टेशन यांचेकडून पुढील तपास करण्यात येत आहे.

इमारत व इतर बांधकाम (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील कलम १ (४) नुसार अधिनियमाच्या तरतुदी दहा किंवा त्यापेक्षा अधिक बांधकाम कामगार काम करीत असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी लागू होतात.

सदर बांधकामाच्या साईटवर प्रत्यक्ष व त्यापूर्वी एकुण ४ बांधकाम कामगार काम करीत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर प्रकरणी इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम १ (४) नुसार तरतुदी लागू होत नाहीत.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील तरतुदीनुसार दिनांक ३१.०३.२०२२ पर्यंत नोंदणीकृत व नूतनीकरण झालेल्या अनुज्ञेय बांधकाम कामगार लाभार्थ्यांना सुरक्षा संच वाटप व अत्यावश्यक वस्तू संच वाटप या योजनेचा लाभ देण्याबाबतच्या सूचना दिनांक ०९.१२.२०२१ व दिनांक १५.१२.२०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील धरणाची स्वच्छता करण्याबाबत**

**(४९) ४०७१२ (११-०४-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील धरणात प्रचंड प्रमाणात कचरा व जलपर्णी वाढून पाणी दुषित

झाल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ग्रामपंचायत आर्थिकदृष्टया सक्षम असताना सुध्दा स्वच्छता अभावी धरणात मोठया प्रमाणात कचरा साठून दुर्गंधी पसरत असून धरणाच्या बंधाऱ्यातून मोठया प्रमाणात होणाऱ्या पाण्याच्या गळतीमुळे सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू धरणातील गाळ व धरण स्वच्छ करण्याबाबत ग्रामपंचायतीने ठराव देखील केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहतीत काय आढळून आले, तद्अनुषंगाने धरणाची दुरुस्ती करून धरणातील कचरा व जलपर्णी काढण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-११-२०२२) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
ग्रामसभा ठराव क्र.११ (१८) दि.०९.०२.२०२२ अन्वये धरण स्वच्छतेबाबतचा ठराव केला आहे.
(४) सदर घाट सुशोभीकरणाचे कामास प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२१-२२ अंतर्गत जिल्हा स्तरावरुन प्रशासकीय मान्यता दि.३१.०१.२०२२ रोजी देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव (जि.नाशिक) ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन करुन नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबत**

**(५०) ४९४३६ (३०-०९-२०२२). श्री. अशोकराव शंकरराव चव्हाण (भोकर):** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वेठबिगार निर्मूलन कायदा अस्तित्वात असतांनाही पालघर जिल्हयात दोन अल्पवयीन आदिवासी मुलींना वेठबिगार म्हणून राबविण्यात येत असल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणासंबंधी राज्यात उघडकीस न आलेली अजून किती प्रकरणे आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्यानुषंगाने संबंधीत दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (६-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) श्री.नरेश केशव भोये,मु.पो.धारणहट्टी ता.जव्हार जि.पालघर येथील आदिवासी कातकरी समाजातील रहिवासी असलेले श्री.भोये यांची मोठी मुलगी कु.मनिषा नरेश भोये,वय-8 वर्षे ही अहमदनगर जिल्हयातील श्री.देवराम कांदडकर व श्री.पुंडलिक कांदडकर,व्यवसास मेंढीपालन यांचेकडे तर छोटी मुलगी कु.काळी नरेश भोय, वय-6 वर्षे ही नाशिक जिल्हयातील श्री.सचिन भागीनाथ सोनवणे,व्यवसाय शेती, यांचेकडे काम करत असल्याचे आढळून आलेले आहे.

सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून,श्री.नरेश केशव भोये यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार जव्हार पोलिस स्टेशन येथे वेठबिगार पध्दती (निर्मुलन) अधिनियम, 1976 आणि बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम, 2015 अन्वये श्री.देवराम कांदडकर, श्री.पुंडलिक कांदडकर आणि श्री.सचिन भागीनाथ सोनवणे यांचेविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम,1986 अन्वये निरीक्षण शेरे पारीत करण्यात आले असून,सदर मालकांविरध्द खटले दाखल करण्याची कार्यवाही कामगार आयुक्त कार्यालयामार्फत सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.